**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.: नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी एकूण दोन सूचना देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये पहिली सूचना माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी "उरण (जि. रायगड) तालुक्यातील जे.एन.पी.टी. साठी संपादित केलेल्या जमिनींच्या बदल्यात शेतकऱ्यांना साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप न झाल्याबाबत" या विषयावर चर्चा करण्यासाठी प्रश्नोतराचा तास स्थगित करण्यासंबंधी आहे. दुसरी सूचना माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, संजय केळकर, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री चंद्रकांत पाटील, केशवराव मानकर, परशुराम उपरकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल यांनी "केंद्रीय दक्षता आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आलेल्या श्री.पी.जे.थॉमस यांच्या नियुक्तीबाबत पंतप्रधान कार्यालयाचे तत्कालीन राज्यमंत्री व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी केंद्रीय दक्षता आयुक्तांची नियुक्ती करताना व्हिजिलन्स क्लिअरन्सची जबाबदारी केरळ सरकारची असल्याचे स्पष्टीकरण करणे व केरळ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी श्री. पी.जे.थॉमस यांच्या घोटाळयाबाबतची माहिती त्यांची नियुक्ती केंद्रीय दक्षता आयुक्त पदी होण्याआधीच पंतप्रधान कार्यालयात दिल्याचे जाहीर करणे त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांविषयी संशयाचे वातावरण निर्माण झाल्याने त्यांनी या संदर्भात तातडीने खुलासा करणेबाबत" या विषयावर चर्चा करण्यासाठी सभागृहाचे आजचे सर्व कामकाज स्थगित करण्यात यावे अशी सूचना दिली आहे.

अशाप्रकारे याठिकाणी देण्यात आलेल्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावातील विषय हे आजच्या कामकाजामध्ये नसले तरी यामधील पहिला विषय सिडकोने शेतकऱ्यांच्या घेतलेल्या जमिनी संबंधीचा आहे. दुसऱ्या सूचनेतील विषयाचा राज्याशी काहीही संबंध नाही. त्यामुळे या दोन्ही सूचना मी दालनामध्ये नाकारल्या आहेत.

(गोंधळ)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण आमचे म्हणणे ऐकून घ्यावे...

अे 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दिलेल्या पहिल्या नियम 289 अन्वये सूचनेतील विषय हा सिडकोने घेतलेल्या जमिनीपैकी साडे बारा टक्के जमिनी शेतकऱ्यांना परत मिळालेल्या नाहीत असा आहे. याबाबत मी जरुर वेगळा निर्णय घेईन. परंतु आज मी या ठिकाणी नियमाप्रमाणे या सूचनेला अनुमती नाकारीत आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या सूचनेतील विषय या राज्याशी संबंधित नसल्यामुळे मी तिला अनुमती नाकारीत आहे.

(विरोधी पक्षाचे सर्व माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**कोल्हापूर शहराला स्वच्छ व शुध्द पेयजलाचा पुरवठा होण्यासाठी**

**काळम्मावाडी धरणाचे सर्वेक्षण करण्याबाबत**

**(१) * १३१४१ श्री.जयंत पाटील, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ९२०२ ला दिनांक ४ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराला स्वच्छ व शुध्द पेयजलाचा पुरवठा होण्यासाठी काळम्मावाडी धरणाचे सर्वेक्षण करुन तसेच योजना तयार करुन निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिकेच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०१० रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार करावयाची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार स्वीकृतीचा ठराव पारीत करुन ठरावानुसार सविस्तर योजना तयार करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना तातडीने केव्हापर्यंत कार्यान्वीत होणार आहे,

(४) नसल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार आवश्यक कार्यवाही पुर्ण करुन सदर योजना दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत कार्यान्वीत करण्याबाबत शासनाची काय भुमिका आहे ?

**प्रा.लक्ष्मणराव ढोबळे :** (१) सदर योजना महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत घेण्याचे प्रस्तावित असून प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.

(२) प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर स्विकृतीचा ठराव पारित करण्याची कार्यवाही कोल्हापूर महानगरपलिकेमार्फत करण्यात येणार आहे.

(३) व (४) प्रस्तावित योजनेचा प्रकल्प अहवाल कोल्हापूर महानगरपालिकेकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** : तारांकित प्रश्न क्र. 13141...

(गोंधळ)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मला प्रश्न विचारावयाचा आहे, माझा माईक चालू नाही, मला ऐकायला येत नाही......

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत)

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबईतील जोगेश्वरी येथील स्वामी विवेकानंद विद्यालय व गोरेगाव येथील जवाहर विद्यालयात शिक्षकांनी नियुक्तीच्यावेळी बनावट पदवी प्रमाणपत्र दिल्याबाबत

(२) * १३२६६ श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.सतीश चव्हाण , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.एम.एम.शेख , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष चव्हाण,श्री.चरणसिंग सप्रा,श्री.हुसेन दलवाई, डॉ.सुधीर तांबे , श्री.विजय सावंत : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या जोगेश्वरी (पूर्व) उपनगरात असलेल्या स्वामी विवेकानंद विद्यालय तसेच गोरेगाव उपनगरातील जवाहर विद्यालयातील शिक्षकांनी नियुक्तीच्या वेळी सादर केलेली शिक्षा शास्त्री ही पदवी बोगस असल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी शिक्षक तसेच सदर खोटया व बनावट पदव्या देणाऱ्या व्यक्ती / संस्थावर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेंद्र दर्डा : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, शिक्षण निरीक्षक (पश्चिम), बृहन्मुंबई यांच्या स्तरावर याबाबत चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर चौकशीत या दोन्ही शाळातील ज्या शिक्षकांच्या पदव्या बोगस आढळून आल्या आहेत. त्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्यात आल्या असून त्यांचे वेतन अदा केले जात नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(गोंधळ)

अे 5....

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

**राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३) * १३७०३ श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.मनीष जैन , श्री.एम.एम.शेख , श्री.सतीश चव्हाण , श्री.रमेश शेंडगे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्रीमती उषाताई दराडे, श्री.हेमंत टकले, श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.नागो गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ९०२१ ला दिनांक ४ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे, परंतु शिक्षण सेवकांच्या मानधनात अद्याप वाढ केलेली नाही, असा भेदभाव संपुष्टात आणण्याकरिता शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात ३ वर्षाचा शिक्षण सेवकाचा कालावधी पुर्ण केल्यानंतर उमेदवारास ६ महीने पर्यंत कायम करण्यात येत नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास प्रश्न भाग (१) नुसार शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) तसेच प्रश्न भाग (१) नुसार तातडीने कार्यवाही करुन प्रश्न भाग (२) नुसार शिक्षण सेवक म्हणून ३ वर्षे सेवा केल्यानंतर त्यास शिक्षण सेवक पदावर कायम नेमणूक देण्याबाबत शासनाची काय भुमिका आहे ?

**श्री.राजेंद्र दर्डा :** (१) नाही.

(२) नाही.

(३) शिक्षण सेवकांच्या मानधन वाढीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रशिक्षित शिक्षण सेवकांना समाधानकारक ३ वर्ष सेवा झाल्यानंतर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्याबाबत शासन निर्णय दि.१४.१०.२०१० अन्वये आदेश देण्यात आलेले आहेत.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत)

(गोंधळ)

**सभापती** : अशा परिस्थितीत कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 12.40 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(दुपारी 12.04 ते 12.40 पर्यंत सभागृह स्थगित)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (ॲड.उषाताई दराडे)**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून घोषणा देतात.)

**राज्य शासनातर्फे ग्रामीण भागासाठी चालविण्यात येणाऱ्या जलस्वराज्य**

**प्रकल्पाचे काम अतिशय संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(4) *14071 श्री. एस. क्यू. ज़मा** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनातर्फे ग्रामीण भागासाठी चालविण्यात येणाऱ्या जलस्वराज्य प्रकल्पाचे काम अतिशय संथगतीने सुरु असून, आजपर्यंत 203 गावातील कामे पुर्ण झालेली नसल्याचे माहे जानेवारी, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील योजना मागील 7 वर्षापासुन कार्यरत असतांनाही उपरोक्त 203 गावांची कामे पुर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(3) नसल्यास, राज्यात उपरोक्त प्रकल्पाद्वारे आतापर्यंत किती गावात सदरील योजनेचे काम पूर्ण झाले आहे तसेच उर्वरित कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्याकरिता** : (1) खरे आहे.
(2) जलस्वराज्य प्रकल्पामध्ये 9 जिल्ह्यामधील ग्रामपंचायतींची निवड सन 2004-2005 व 17 जिल्ह्यामधील ग्रामपंचायतींची निवड सन 2005-2006 या आर्थिक वर्षात करण्यात आलेली होती. जलस्वराज्य प्रकल्प हा मागणी आधारीत व लोकांचा सहभाग या तत्त्वावर राबविण्यात आलेला असून हा प्रकल्प शासनाच्या अन्य पुरवठा आधारीत कार्यपध्दती पेक्षा थोडासा वेगळा आहे. त्यामुळे योजनेच्या नियोजनासाठी तसेच अंमलबजावणी करण्यासाठी गावाला सक्षम करणे गरजेचे होते. यास्तव प्रकल्पात अपेक्षित धरण्यात आलेल्या कालावधीपेक्षा जास्त अवधी ग्रामस्थांच्या क्षमता बांधणीसाठी सुरुवातीस द्यावा लागलेला असल्याने प्रकल्पातील कामे पूर्ण होण्यास वेळ लागलेला आहे.

माहे जानेवारी, 2011 मध्ये कामे शिल्लक असलेल्या 203 ग्रामपंचायतींपैकी 34 ठिकाणी पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला होता व राहिलेल्या 169 ग्रामपंचायतींची कामे ही काही ठिकाणी अपहारामुळे फौजदारी गुन्हे दाखल झाले असल्याकारणाने भूसंपदानाचा प्रश्न, काही ठिकाणी मूल्यांकनात्मक, तफावतीमुळे, वीज जोडणी मिळणे, गावाकडून मिळणारा कमी प्रतिसाद इत्यादी विविध कारणामुळे ही कामे अपूर्ण राहिलेली होती.
(3) सद्यस्थितीत जलस्वराज्य प्रकल्पामधील 3007 ग्रामपंचायतींपैकी 2906 ग्रामपंचायतींमध्ये पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला असून राहिलेल्या 101 ग्रामपंचायतींमध्ये पाणी पुरवठा सुरु होणे बाकी आहे. या ग्रामपंचायती मधील राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठीचे नियोजन करण्यात आलेले आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14071 . . . .

(घोषणा)

श्री.सय्यद ज़मा : सभापति महोदया, यहां पर उत्तर में बताया गया है कि जो काम बाकी रह गए हैं उनको पूरा करने का नियोजन किया गया है. मुझे पूछना है कि इस योजना के बारे में जो फंड अभी तक खर्च नहीं किया गया है, वह फंड इन बचे हुए कामों पर कब तक खर्च कर दिया जाएगा और वे बचे हुए काम कब तक पूरे कर दिए जाएंगे. क्या इस बारे में माननीय मंत्री महोदय कोई निश्चित समय सीमा बता सकते हैं ?

(गोंधळ)

( उत्तर देण्यात आले नाही )

----

. . . .बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात विशेषत: बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील रोजगार सेवक दोन वर्षापासुन मानधनापासून वंचित असल्याबाबत**

**(5) *13944 श्री.विनायकराव मेटे, श्री.एम.एम.शेख, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, श्रीमती उषाताई दराडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, प्रा.सुरेश नवले, श्री.राजन तेली, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात विशेषत: बीड जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील रोजगार सेवक गेल्या 2 वर्षापासून मानधनापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या योजनेअंतर्गत शासन व मजूर यांच्यातील दुवा म्हणुन काम करणाऱ्या ग्राम रोजगार सेवकांना मानधनापासून वंचित रहावे लागण्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच सदर ग्रामसेवकांना त्वरित मानधन देऊन त्यास विलंब लावण्याऱ्या शासनाच्या दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितीन राऊत** : (1) व (2) अंशत: खरे आहे. दिनांक 5/6/2010 च्या शासन निर्णयान्वये ग्रामरोजगार सेवकांचे मानधन मग्रारोहयोच्या खर्चाच्या 0.75 टक्के वरुन 2.25 टक्के वाढविण्यात आले आहे. ग्रामरोजगार सेवकांनी केलेल्या कामाबद्दल 0.75 टक्के इतके मानधन त्यांना वेळीच अदा करण्यात आले आहे. तथापि वाढीव रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

(3) वाढीव मानधनाचे वाटप करण्याची कार्यवाही चालू आहे. विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(घोषणा)

उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.

----

. . . .बी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**राज्यातील शिक्षण सेवक कायदा रद्द करण्याची केलेली मागणी**

(6) *13348 **श्री.रमेश शेंडगे, श्री.प्रकाश बिनसाळे,श्री.हेमंत टकले,श्री.सतीश चव्हाण,श्रीमती उषाताई दराडे, श्री.विक्रम काळे, श्री.विनायकराव मेटे, डॉ.नीलम गोऱ्हे,श्री.परशुराम उपरकर, श्री.कपिल पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिक्षण सेवक कायदा रद्द करण्यात यावा तसेच अन्य काही मागण्याचे निवेदन मा.मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, सचिव शालेय शिक्षण विभाग यांना अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाने माहे डिसेंबर, 2010 च्या शेवटच्या आठवड्यात दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त निवेदनातील मागण्यांनुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद दर्डा** : (1) शिक्षक सेवक पध्दती रद्द करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(2) प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत शिक्षण सेवकांची स्वतंत्र पदे नाहीत. रिक्त पदांवर शिक्षण सेवकांची 3 वर्षांसाठी मानधनावर नियुक्ती करण्यात येते. शिक्षणसेवकाचा समाधानकारक कालावधी पूर्ण केल्यावर त्यास नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात येते. त्यामुळे शिक्षण सेवक योजना रद्द करण्याची मागणी स्वीकारता येत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(गोंधळ)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदया, मी याठिकाणी माननीय शिक्षण मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, शिक्षण सेवक पध्दती रद्द करण्याबाबत जे निवेदन देण्यात आले होते, त्याबाबतीत शासन किती दिवसामध्ये निर्णय घेणार आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदया, शिक्षण सेवक पध्दती रद्द करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झालेले आहे. पण प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक मध्ये शिक्षण सेवकांची स्वतंत्र पदे नाहीत.तसेच रिक्त पदावर शिक्षण सेवकांची तीन वर्षासाठी मानधनावर नियुक्ती करण्यात येते. त्या मुळे सध्या शिक्षण सेवकांचे मानधन वाढविण्याचा विषय विचाराधीन आहे.

(घोषणा)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, "शिक्षण सेवक" हा जो अवमानकारक उल्लेख केला जातो. त्यामुळे आपण हे नामाभिधान बदलणार आहात काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, आपण या अधिवेशनाच्या काळामध्ये त्यांचे मानधन वाढविणार आहात काय ?

(घोषणा)





(गोंधळ)

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, "शिक्षण सेवक" हे नामाभिधान बदलण्यात यावे अशा पध्दतीची मागणी वारंवार होत असते हे खरे आहे. पुढच्या दोन महिन्यामध्ये यासंबंधी चांगल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारे विचार करुन हे नामाभिधान कसे बदलता येईल, तसेच शिक्षण सेवकांचे मानधन कसे वाढविता येईल आणि त्याचबरोबर शिक्षणाचा दर्जा देखील कसा वाढविता येईल यासंबंधी आम्ही निश्चितपणे निर्णय घेऊ.

(गोंधळ)

यानंतर कु.थोरात . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ D/ प्रथम सौ. रणदिवे... 12:10

( घोषणा )

ता.प्र.क्र. 13348...

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये माननीय शिक्षण मंत्री यांनी "दिनांक 13-12-2010 ला "शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव दोन महिन्यात मंत्रिमंडळापुढे नेण्यात येईल आणि माननीय मुख्य मंत्र्यांबरोबर चर्चा करुन या संबंधीचा निर्णय घेण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर दिले होते" परंतु अद्याप यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे नेण्यात आलेला नाही. साधरणतः आठ ते पंधरा दिवसात या संबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे नेण्यात येईल काय आणि शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्यात येईल काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी मागील अधिवेशनात सांगितले होते त्याप्रमाणे शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत कॅबिनेट नोट पाठविण्यात आलेली आहे. याबाबतीत शासनाचे असे मत आहे की, शिक्षण सेवक, ग्राम सेवक इत्यादी पदांबाबत एकत्रित कॅबिनेट नोट यावयास पाहिजे. त्या पध्दतीने तिन्ही मंत्रालये काम करीत आहेत. शासन या बाबतचा निर्णय लवकरात लवकर घेईल

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शिक्षण सेवक हा अवमानकारक उल्लेख आहे म्हणून हे नामाभिधान बदलण्यात येईल काय? नागपूर अधिवेशनामध्ये माननीय शिक्षण मंत्री यांनी शिक्षण सेवकांच्या मानधनात दोन महिन्यात वाढ करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. किमान या अधिवेशनाच्या कालावधीत हा प्रश्न निकाली काढण्यात येईल काय आणि त्यासंबंधीचा निर्णय सभागृहासमोर येईल काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या एकूण सर्वच प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभपाती महोदय, नागपूर अधिवेशनामध्ये माननीय शिक्षण मंत्री यांनी शिक्षण सेवकांचे मानधन दोन महिन्यात वाढविण्यात येईल असे आश्वासन दिले होते. हे सरकार फक्त आश्वासन देत आहे की काही कार्यवाही करीत आहे हे जनतेला कळले पाहिजे. माननीय शिक्षण मंत्र्यांकडून सन्माननीय सदस्यांच्या आणि शिक्षकांच्या मोठया प्रमाणात अपेक्षा आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( घोषणा )

ता.प्र.क्र. 13348...

श्री. विक्रम काळे......
माननीय शिक्षण मंत्री हे निर्णय घेणारे मंत्री आहेत. म्हणून आमची अशी मागणी आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी शिक्षण सेवकांचे नामाभिधान बदलण्यात येईल काय आणि शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात येईल काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या मानधनाचा प्रश्न हा महत्वाचा आणि जिव्हाळयाचा आहे. आम्हा सर्वांना असे वाटते की, शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ झाली पाहिजे. त्या संदर्भातील कॅबिनेट नोट मुव्ह करण्यात आलेली आहे. लवकरात लवकर यातून मार्ग काढण्यात येईल एवढाच शब्द मी या ठिकाणी देतो.

( घोषणा )

..3..

अरुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ D/

**राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षण संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती मिळणेबाबत**

**(७) * १२६७८ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.मनीष जैन , श्री.विक्रम काळे , श्री.नागो गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी, दुर्गम व नक्षलग्रस्त क्षेत्रातील खाजगी शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती व अतिरिक्त घरभाडे भत्ता मंजुर करण्याबाबतच्या दिनांक १४ ऑगस्ट, २००८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार एकस्तर पदोन्नती लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासन निर्णयातील जाचक अटींमुळे त्याचा लाभ फार कमी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयातील जाचक अटी रद्द करण्यात येणार आहेत काय,

(४) असल्यास, जाचक अटी रद्द करण्याबाबतचा निर्णय केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री.राजेंद्र दर्डा :** (१) एकस्तर वेतनश्रेणी काही अटीस अधीन राहून लागू करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) या अनुषंगाने पुन्हा तपासणी करण्यात येत आहे.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत )

( घोषणा )

**तालिका सभापती :** अशा या गोंधळाच्या परिस्थितीमुळे सभागृहाचे कामकाज करणे अशक्य असल्यामुळे मी आता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे.

सभागृहाची बैठक उद्या बुधवार, दि□ां□ 16 मार्च, 2011 रोजी दुपारी 12.00 वाजता पु□ भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ दुपारी 12 वाजू□ 47 मि□टां□, बुधवार, दि□ां□ 16 मार्च, 2011 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्य□ स्थ□ि झाली )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही